महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**पी.आर-३/ टॅरिफ/४२५९९** **दिनांक : १३/१२/२००७**

## वाणिज्य परिपत्रक क्र. ७३

**विषय :-** राज्य शासनाच्या मालकीच्या व अंगीकृत,जलसंपदा विभागाच्या वसाहतीकडून डिमांड चार्जेसची आकारणी (स्थिर आकार) व वसुलीबाबत.

**संदर्भ :- तत्कालीन म.रा.वि.मंडळाचे विभागीय परिपत्रक (वाणिज्य) क्र. ५३४ दिनांक ०७.०७.१९९४.**

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक भातसा ०१०७ (४५/२००७) मोप्र-१ दिनांक १५.०५.२००७ या परिपत्रकात तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या विभागीय परिपत्रक (वाणिज्य) ५३४ दिनांक ०७.०७.१९९४ नुसार राज्य शासनाच्या मालकिच्या व अंगिकृत संस्थांना डिमांड चार्जेस अदा करण्यापासुन सुट देण्यात आल्याचे दर्शविले आहे. तसेच त्या परिपत्रकाच्या तरतुदीनुसार जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील ज्या ज्या कार्यालयाअंतर्गत प्रकल्प वसाहती आहेत अशा शासनाच्या मालकीच्या व अंगिकृत संस्थांना डिमांड चार्जेसची (स्थिर आकार) अदायगी करण्यापासुन सुट देण्यात यावी व डिमांड चार्जेस पोटी आकारण्यात येणारी वसुली थांबविण्यात यावी व काही ठिकाणी वसुली झाली असल्यास सदर अतिप्रदानाची रक्कम जलसंपदा विभागास परत करण्यात यावी असे नमुद करण्यात आलेले आहे.

सदर बाबतीत असे कळविण्यात येते कि, १ जुलै १९९६ पासून लागु करण्यात आलेल्या नविन दर पत्रकानुसार सदर वाणिज्य परिपत्रक क्र.५३४ दि. ७.०७.१९९४ हे रद्द झालेले होते. तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम, २००५ च्या कलम १९ अन्वये २०.०१.२००५ च्या पूर्वीची या विनिमयाशी विसंगत असलेली परिपत्रके, आदेश आणि इतर दस्तऐवज किंवा पत्रे अवैध ठरविण्यात आलेली आहेत. त्यामुळे सदर सवलत सुरु ठेवणे वितरण कंपनीवर बंधनकारक नाही. सदर बाबत शासनाला या कार्यालयाचे पत्र क्र. पी-आर-३/टॅरिफ/२९२५६ दिनांक १९.०७.२००७ नुसार कळविण्यात आलेले आहे.

तरी वितरण कंपनीच्या क्षेत्रिय अधिका-यांना कळविण्यात येते कि, सदर विभागीय परिपत्रक (वाणिज्य) क्र. ५३४ दिनांक ०७.०७.१९९४ हे दि. २०.१.२००५ पासुन रद्द झाल्याचे समजून राज्य शासनाच्या मालकीच्या व अंगिकृत, जलसंपदा विभागाच्या वसाहतींकडून मा. वीज नियामक अयोगाच्या आदेशान्वये प्रचलीत असलेले डिमांड चार्जेस (स्थिर आकार) वसुल करण्यात यावे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना :-**

१. मुख्य अभियंता, सर्व सं व सु, परिमंडळे, म.रा.वि.वि.कं.मर्यादित.
२. अधिक्षक अभियंता, सर्व सं व सु, मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.
३. कार्यकारी अभियंता, सर्व सं व सु, विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.
४. उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, सर्व सं व सु, उपविभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.